# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.02.2025** **वार- मंगळवार**

---

**मंत्रिमंडळनिर्णय**

पुणे जिल्ह्यातील जनाई- शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतर करण्याच्या कामाला आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या कामासाठी 438 कोटी 47 लाख 87 हजार 483 रुपयांच्या खर्चालाही मान्यता देण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि पुरंदर तालुक्यातील सिंचनासाठी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना महत्त्वाची आहे. ही योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित न झाल्याने या परिसरातील 40 हून अधिक गावांना टंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे या योजनेतून पाणी मिळावं अशी मागणी शेतकरी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती. बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमुळे 1 टिएमसीपेक्षा जास्त पाण्याची बचत होणार आहे.

**जीबीएस**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात काल 37 वर्षीय रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्यात या आजाराने आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, राज्यातील जीबीएस रुग्णसंख्या 192 झाली आहे. त्यातील 167 रुग्णांना जीबीएसचं निदान झालं आहे. पुण्यातील जीबीएस रुग्णसंख्येतील वाढ सुरूच असून, पुणे महापालिका क्षेत्रात 39, महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांमध्ये 91, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात 29, पुणे ग्रामीणमध्ये 25 रुग्ण आढळून आले आहेत. राज्याच्या इतर जिल्ह्यांत आतापर्यंत 8 रुग्ण आढळून आले आहेत. राज्यातल्या 48 जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत तर 21 रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. 91 रुग्णांना उपचारानंतर घरी सोडण्यात आलं आहे.

**पुणे पोलीस**

पुणे पोलिसांच्या कॉप-24 या उपक्रमाचं, येत्या 15 फेब्रुवारीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. तरुणी किंवा महिलेने अडचणीच्या काळात मदतीसाठी 112 या क्रमांकावर कॉल केल्यानंतर घटनास्थळी महिला बीट मार्शल पाठवले जातात, कॉप -24 च्या माध्यमातून हे बीट मार्शल चोवीस तास शहरात गस्त घालणार आहेत. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या संकल्पनेतील या उपक्रमासाठी 726 कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यात 526 पुरूष आणि 200 महिला कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांना वेगळा गणवेश देण्यात आला आहे. त्यांना 123 दुचाकी वाहनं तसच 39 मोबाईल व्हॅन  देण्यात आल्या आहेत. या सर्व वाहनांना जीपीएस लावण्यात आले असून, त्याद्वारे बीट मार्शलवर नियंत्रण ठेवलं जाणार आहे.

**तूरखरेदी**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये होत असलेल्या लिलावात तुरीचा दर हमी भावापेक्षा कमी निघत असल्याने आधारभूत दरानुसार हमी भाव खरेदी केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव बाजार समितीने सादर केला होता. त्यावर सकारात्मक निर्णय झाला असून आता हमी दराने तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरू झाली आहे, अशी माहिती समितीचे सभापती विश्वासराव आटोळे आणि उपसभापती रामचंद्र खलाटे यांनी दिली. येत्या 22 फेब्रुवारीपर्यंत तूर उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदणी करावी, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात मोकळ्या जागेवर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आगळावेगळा उपाय केला आहे. या कर्मचाऱ्यांनी चिंचवड परिसरातील कावळे वखार मोहननगर इथल्या सार्वजनिक जागेवर टाकाऊ वस्तूंचा अतिशय कल्पकतेने वापर करून सुंदर कलाकृती उभारली आहे. 'आर्ट टू वेस्ट' ही संकल्पना राबवल्यामुळे हा परिसर कचरामुक्त झाला आहे. शिवाय याठिकाणी आता सेल्फी काढण्याचा आनंदही नागरिक घेऊ लागले आहेत.

**<u>पुणे मनपा</u>**

पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी 13 हजार 854 अर्ज दाखल झाले आहेत. त्यापैकी 6 हजार 897 लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये 11 कोटी 71 लाख 75 हजार रुपये जमा करण्यात आल्याची माहिती समाज विकास विभागाचे उपायुक्त नितीन उदास यांनी दिली.

**<u>एरोमॉडेलिंग</u>**

दी एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियानं 'चॅलेंजस इन एरोस्पेस फॉर विकसित भारत 2047' या राष्ट्रीय परिषदेच्या निमित्तानं विद्यार्थ्यांसाठी एरोमॉडेलिंग कार्यशाळा, चित्रकला, संशोधन प्रकल्प आणि पोस्टर प्रदर्शनाचं आयोजन केलं होतं. यात शालेय स्तरावरील पोस्टर स्पर्धेत मुंबईच्या श्रद्धा प्रधान हिने प्रथम, तर पुण्याच्या एन श्वेतांजली हिने द्वितीय क्रमांक मिळवला. महाविद्यालयीन गटात पुण्याच्या शाश्वती हिंगे आणि ज्योती नगरकर या दोघींनी पहिला आणि दुसरा क्रमांक मिळवला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं असून कमाल 35 तर किमान 15 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही हवामानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांत मध्ये विविध भारतीच्या पुणे केंद्रांवर.**